# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/६२३

दिनांक : 22 JUN 2018

विषय : पदविका/पदवी/ पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका / पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका / पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यतेबाबत...

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र. २४४/तांशि-४, दिनांक : २२.६.२०१८.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून/ करीता पदविका/पदवी/ पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका / पदवी/ पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका / पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ मिळालेली आहे, तथापि, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली नाही, अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करुन घेण्याच्या अनुषंगाने संचालनालयास सोबत जोडलेल्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपर वर (अभ्यासक्रम निहाय) नोंदणीकृत हमीपत्र तात्काळ संचालनालयास सादर करावे. तसेच ज्या औषधनिर्माणशास्त्र पदविका /पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षापर्यंत शासन मान्यता दिलेल्या व अद्यापी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता न मिळविलेल्या सर्व संस्थांनी सुध्दा सोबतच्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपर वर (अभ्यासक्रम निहाय) नोंदणीकृत हमीपत्र तात्काळ संचालनालयास सादर करावे. ज्या संस्था उपरोक्त हमीपत्र सादर करणार नाहीत अशा संस्थांमधील संबंधीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश देण्यात येणार नाही, याची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी

तसेच सदर हमीपत्र संचालनालयास सादर केल्यानंतरही विहित मुदतीत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणार नाहीत/ संचालनालयास सादर करणार नाहीत, अशा संस्थांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्यात येणार नाही, याचीही संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.
२. संबंधीत सर्व संस्था (संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन)
३. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, आयटीसेल, मुख्य कार्यालय, मुंबई यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
४. कार्यासन क्रमांक २ व २ अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवड नस्ती.

# हमीपत्र

मी -----(नाव)------------- अध्यक्ष/ सचिव, ------(सोसायटी/ ट्रस्टचे नाव)--- व ----- (प्राचार्यांचे नाव) ---- प्राचार्य, ---- (कॉलेजचे नाव) ---- आम्ही असे लिहून देतो की,

१. आमच्या संस्थेच्या ----- (महाविद्यालय/ तंत्रनिकेतनाचे नाव) --- डीटीई कोड ----- या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून — (पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास/विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका/ पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे/ विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ )---- यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ------, दिनांक -------- अन्वये मान्यता मिळालेली आहे व/वा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक ----------, दिनांक ---------- अन्वये शासन मान्यता मिळालेली आहे.

२. त्या अनुषंगाने आमच्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांस सहा महिन्यांच्या आत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्यात येईल. आमच्या संस्थेने विहित मुदतीत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता न मिळवल्यास आमच्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात प्रवेश देण्यात येणार नाहीत याची संस्थेला पुर्णपणे जाणीव आहे.

३. तसेच सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास या प्रकरणी आमची संस्था पुर्णपणे जबाबदार राहील व त्यास तंत्रशिक्षण संचालनालय व महाराष्ट्र शासन जबाबदार असणार नाहीत, याची आम्हाला जाणीव आहे.

वरील हमीपत्रातील माहिती पुर्ण व खरी आहे.

स्थळ :

दिनांक :

| | |
|---|---|
| सही | सही |
| ( सचिव/ अध्यक्ष) | (प्राचार्य) |